

**कोल्हापूर : जिल्हा न्यायालयास अभ्यास भेटीप्रसंगी शहाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक.**

# शहाजी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापकांची जिल्हा न्यायालयास भेट

**कोल्हापूर :** शहाजी महाविद्यालयातील राज्यशास्त्र विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी जिल्हा न्यायालयास अभ्यास दौऱ्यांतर्गत भेट दिली. न्यायालयीन कामकाज पद्धती कशा पद्धतीने चालते याचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी जिल्हा न्यायालय भेटीचे आयोजन केले होते. न्या. प्रीतम पाटील यांनी विद्यार्थ्यांना न्यायालयीन कामकाजाबद्दल माहिती दिली. घटस्फोटाचे न्यायालय व बाल गुन्हेगार न्यायालय या दोन केसचे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामकाज पाहता आले. कोल्हापूर बार कौन्सिलचे माजी सचिव ॲड. विजयकुमार ताटे-देशमुख यांनी विद्यार्थी व न्यायाधीश यांच्यामध्ये संवाद घडवून आणला. अभ्यास भेटीसाठी राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल मांडणीकर, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे सहकार्य लाभले.